# महाराष्ट्र राज्य अर्थसंकल्प, २०१०-११
# आदिवासी विकास विभागावरील चर्चेसाठी टिपण

## आदिवासी विकास : शासनाच्या उक्ती व कृतीतील तफावत दर्शविणारी वस्तुस्थिती

''संविधानाच्या अनुच्छेद ४६ अन्वये, समाजातील दुर्बल घटकांच्या आणि विशेषत: अनुसूचित जाती, जमाती यांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक हितसंबंधाकडे विशेष लक्ष देऊन त्यांचा विकास करण्याकरिता व त्यांना सामाजिक अन्याय आणि सर्व प्रकारचे शोषण यापासून संरक्षण देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.''

– दरवर्षीचे कार्यक्रम अंदाजपत्रक

- आदिवासी भागातील आरोग्य सुविधा अपुऱ्या असून, १ लाख लोकसंख्येमागे सरासरी केवळ ३ प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत. प्रत्येकी ३ हजार लोकसंख्येमागे एक उपकेंद्र असा निकष असताना प्रत्यक्षात मात्र ७ ते ८ हजार लोकसंख्येमागे एक उपकेंद्र आहे.
- ठाणे जिल्ह्यामध्ये लोकसंख्येच्या निकषाप्रमाणे ६४ प्राथमिक आरोग्य केंद्रांची आवश्यकता असताना केवळ ४८ अस्तित्वात आहेत. तर ४३१ उपकेंद्रांची आवश्यकता असताना ३२४ उपकेंद्रे अस्तित्वात असून त्यापैकी १९४ उपकेंद्रे बांधलेलीच नाहीत. अनेक उपकेंद्रांमध्ये निवासी वैद्यकीय अधिकारी नसून बहुउद्देशीय कर्मचाऱ्यांच्या ३६ टक्के जागा रिक्त आहेत. आरोग्य केंद्रांमध्ये औषधांचा साठा पुरेसा नसून ५० टक्क्यांपेक्षा कमी महिलांना प्रसुतीपश्चात उपचार मिळतात. लसीकरणाचे प्रमाण केवळ ७० टक्के आहे.
- तिसऱ्या व चौथ्या श्रेणीतील कुपोषित मुलांचे प्रमाण सर्वात जास्त गडचिरोली, नंदुरबार व अमरावती या तीन जिल्ह्यांमध्ये असून या जिल्ह्यांमधील काही भागात (जसे अमरावतीमध्ये धारणी, नंदुरबारमध्ये तळोदा, ठाणे जिल्ह्यात मोखाडा) ते अत्यंत गंभीर आहे.
- १९९३-९६ या काळात मेळघाटात ४ हजार मुले कुपोषणाने दगावली, यापैकी ४२ टक्के मुले १ ते ६ वयोगटातील होती.
- ४१.८ टक्के आदिवासी भूमिहीन असून, कातकरी व कोलाम या आदिम जमातीपैकी अनुक्रमे ८३ टक्के व ६३ टक्के लोक भूमिहीन आहेत. शिवाय जमीनधारकांपैकी ७० टक्क्यांहून अधिकांकडे २ हेक्टरपेक्षा कमी जमीन आहे.
- आदिवासी जमीन पुन:स्थापित करण्यासंदर्भात दाखल ४५,६३४ प्रकरणांपैकी ५६ टक्के प्रकरणात जमीन आदिवासींच्या नावे पुन:स्थापित झालेली नाही.
- देशाच्या तुलनेत ७.३ टक्के एवढे वनक्षेत्र राज्यात आहे, मात्र संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांची संख्या देशाच्या तुलनेत केवळ ३.२ टक्के एवढीच आहे.
- ठाणे येथील रोजगार सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी केलेल्या सुशिक्षित आदिवासींपैकी केवळ ४ टक्के बेरोजगारांना शासकीय नोकरीत सामावून घेतले गेले. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिकलेल्या व नोंदणी केलेल्या १३९२ बेरोजगारांपैकी केवळ १४ म्हणजे १ टक्के बेरोजगारांनाच शासकीय नोकरी मिळाली.
- हंगामी स्थलांतर रोखण्यामध्ये रोजगार हमी योजना प्रभावहीन ठरली असून, मजुरी व धान्य मिळण्यात होणारा विलंब व इतरत्र मिळणारी अधिक मजुरी त्यास कारणीभूत ठरली आहे.
- स्थलांतरित आदिवासी मजुरांच्या हक्काचे संरक्षण करण्यात कामगार विभाग अपयशी ठरला असून, हे मजूर नव्या युगातले 'गुलाम' बनून राहिले आहेत.

- ५व्या इयत्तेपुढे आदिवासी विद्यार्थ्यांच्या पटसंख्येत सातत्याने घट होताना दिसते. सातवी इयत्तेपुढे शिक्षण देणाऱ्या माध्यमिक आश्रमशाळांची संख्या पुरेशी नसल्यामुळे ८वीच्या स्तरावर होणारी गळती मोठी आहे.
- १०वीच्या स्तरावर होणारी ७४ टक्के गळती हे आश्रमशाळांतील शिक्षणाचा दर्जा योग्य नसल्याचे द्योतक आहे.
- तंत्र शिक्षणाबाबत आदिवासींची सर्व मदार ही शासकीय संस्था व अनुदानित संस्थांवर आहे. विनाअनुदानित संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्यांमध्ये केवळ ०.३६ टक्के आदिवासी होते.
- आदिवासी जीवनाशी विसंगत शिक्षण पद्धती व शिक्षणाचा खालावलेला दर्जा अशा विचित्र कात्रीत सापडलेला आदिवासी विद्यार्थी शाळेतून गळल्यानंतर ना त्याचेकडे परंपरागत कौशल्ये असतात, ना त्याला शेतात काम करण्याची माहिती असते, ना त्याला शेतीशिवाय दुसरी कोणते काम मिळते. जे थोडे शिक्षणात यशस्वी होतात त्यांना बहुतेकदा निम्नस्तरावरील शासकीय नोकरी मिळते.

*संदर्भ : महाराष्ट्र राज्य विकास अहवाल, नियोजन आयोग (सोबतच्या पॉलिसी ब्रीफमधील पान क्रमांक २ वर महाराष्ट्रातील आदिवासी जनतेसंदर्भात अधिक माहिती दिलेली आहे).*

## राज्यातील ८.९ टक्के लोकसंख्येवर राज्य अर्थसंकल्पापैकी ३ टक्केही रक्कम खर्च होत नाही.




| | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | ६९४.३ | ५६१.१ | ७२६.८ | ६७७.६ | १२३२.७ | १३५४.२ | १९६७.३ | २३२५.६ | १४१८.४ | ३८४४.३ |
| सुधारित अंदाज | ६२५.४ | ६८४.० | ९२४.५ | ८६२.४ | १४६५.८ | १८८६.१ | २४२२.६ | २९७२.७ | ३१४९.३ | |
| प्रत्यक्ष | ७८०.५ | ६२२.३ | ७८७.९ | ७८८.९ | १३७३.१ | १७६२.५ | २१६१.१ | २६१०.१ | | |




| | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| टक्केवारी | १.६० | १.४१ | १.०१ | १.११ | १.०३ | १.८५ | २.२७ | २.६२ | २.५९ | २.५२ | २.९७ |

*स्त्रोत: अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका व वित्तविषयक विवरणपत्र, वसुलीच्या रकमा वजा करून*

## आदिवासी उपयोजनेचा अनुशेष

## आदिवासींच्या हक्काचे रु. ७ हजार ९४३ कोटी शासनाने हडपले!

वर्ष २००७-०८ अखेर आदिवासी उपयोजनेचा अनुशेष रु. ६ हजार ६२२ कोटी ६० लाख एवढा होता (सोबतच्या पॉलिसी ब्रीफमधील पान क्रमांक ६ पाहावे). वर्ष २००८-०९ व २००९-१०मधील आदिवासी उपयोजनेवरील आदिवासी उपयोजनेवर प्रत्यक्षात झालेला खर्च पाहता अनुशेषाची रक्कम रु. ७ हजार ९४३कोटींवर पोहोचल्याचे दिसते.

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| वर्ष | वार्षिक योजना नियतव्यय | आदिवासी उपयोजना ९ टक्क्याप्रमाणे अपेक्षित तरतूद | आदिवासी उपयोजना प्रस्तावित तरतूद | प्रत्यक्ष खर्च | संचित अनुशेष (३-५) |
| २००७-०८ | २०,२००.०० | १८१८.०० | १७९८.०० | १६५९.०० | ६६२२.६० |
| २००८-०९ | २५,०००.०० | २२५०.०० | २२३८.०० | २०२७.४२ | ६८४५.१८ |
| २००९-१०* | ३७,९१५.०० | ३४१२.३८ | २३१४.०० | २३१४.०० | ७९४३.५६ |

* वर्ष २००९-१०मध्ये शासन आदिवासी उपयोजनेसाठी प्रस्तावित केलेली सर्व तरतूद खर्च करेल असे गृहीत धरून अनुशेषाची रक्कम काढलेली आहे.

महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणीमध्ये वर्ष २००९-१० मधील पहिल्या ७ महिन्यांमध्ये म्हणजे ऑक्टोबर, २००९ पर्यंत आदिवासी उपयोजनेवर प्रत्यक्षात केवळ रु. १९७ कोटी ७६ लाख खर्च झाल्याचे नमूद केले आहे. प्रस्तावित तरतुदीच्या ही रक्कम केवळ ८.५ टक्के आहे.

### राज्यातील एकूण तसेच आदिवासींमधील साक्षरतेचे प्रमाण

| वर्ष | एकूण | | | अनुसूचित जमाती | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | महिला | एकूण | पुरुष | महिला | एकूण |
| १९६१ | ४२.०४ | १६.७६ | २९.८२ | १२.५५ | १.७५ | ७.२१ |
| १९७१ | ५१.०४ | २६.४३ | ३९.१३ | १९.०६ | ४.२१ | ११.७४ |
| १९८१ | ५८.६५ | ३४.६३ | ४७.०२ | ३२.३८ | ११.९४ | २२.२९ |
| १९९१ | ७६.५६ | ५२.३० | ६४.८७ | ४९.०८ | २४.०८ | ३६.७७ |
| २००१ | ८६.०० | ६७.०० | ७६.९० | ६७.०० | ४३.१० | ५५.२० |

*स्रोत: भारत सरकारच्या ग्राम विकास मंत्रालयाच्या संकेतस्थळावरून*

### आदिम जमातींमधील साक्षरता

| तपशील | पुरुष | स्त्री | एकूण |
|---|---|---|---|
| आदिवासी | ४९.०८ | २४.०३ | ३६.७७ |
| आदिम जमाती | ३१.९७ | १७.८६ | २५.०२ |
| कातकरी | २१.७० | १०.७९ | १६.३८ |
| कोलाम | ४५.६६ | २७.८३ | ३६.८८ |
| माडिया | ३०.१९ | १६.०९ | २३.१९ |

*स्रोत: आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या बेंचमार्क सर्वेक्षणानुसार. १९९१च्या जनगणनेवर आधारित.*

## आदिवासी विद्यार्थ्यांमधील गळतीचे प्रमाण

| इयत्ता | सर्वसाधारण गळतीचे प्रमाण | | आदिवासी विद्यार्थ्यांमधील गळतीचे प्रमाण | |
|---|---|---|---|---|
| | मुलगे | मुलगी | मुलगे | मुलगी |
| २ | ६ | ६ | १२ | ११ |
| ३ | ९ | ९ | १८ | १८ |
| ४ | १५ | १५ | २७ | २७ |
| ५ | १२ | १४ | ३३ | ३८ |
| ६ | १७ | १९ | ४३ | ४७ |
| ७ | २६ | २७ | ५२ | ५६ |
| ८ | ३४ | ३८ | ५८ | ६६ |
| ९ | ३९ | ४४ | ६० | ७० |
| १० | ५० | ५५ | ७२ | ७७ |

*स्रोत: आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या बेंचमार्क सर्वेक्षणानुसार*

## दारिद्र्यरेषेखालील आदिवासी कुटुंबांची उत्पन्ननिहाय वर्गवारी

| तपशील | अनुसूचित जमाती | एकूण |
|---|---|---|
| दारिद्र्यरेषेखालील कुटुंब संख्या | ७,१९,०८५ | ३६,१४,९१३ |
| दरमहा उत्पन्न रु २५०पेक्षा कमी | १,८०,०७९ | ८,२९,१८० |
| दरमहा उत्पन्न रु. २५०-४९९ | २,८६,९४९ | १३,६२,१६७ |
| दरमहा उत्पन्न रु. ५००-१४९९ | २,०६,९१५ | ११,२१,६४६ |
| दरमहा उत्पन्न रु.१५००-२५०० | २८,०३५ | १,८०,२३१ |
| दरमहा उत्पन्न रु. २५०० पेक्षा जास्त | ६,८७५ | ४८,४०९ |
| उत्तर नाही | १०,२३२ | ७३,२८० |

*स्रोत: भारत सरकारच्या ग्राम विकास मंत्रालयाच्या संकेतस्थळावरून*